ERC
D: 09/05/08
No. 4238

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ५.५.२००८

## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक आयईए-२००८/प्र.क्र. ११ / ऊर्जा-३. - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा आणि केंद्र शासनाने तयार केलेल्या, "अपील प्राधिकाऱ्यांकडील अपील नियम, २००४" च्या नियम-३ अनुसार महाराष्ट्र शासन याव्दारे कमी दाब व उच्च दाब या वीज ग्राहक वर्गवारीनुसार खालीलप्रमाणे मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालयाच्या खालील अधिकाऱ्यांना उक्त अधिनियमाच्या कलम १२७ अंतर्गत असलेल्या अपीलाच्या प्रयोजनासाठी अपील प्राधिकारी म्हणून पदनिर्देशित करीत आहे.

| अ.क्र. | ग्राहक वर्गवारी | अपीलीय प्राधिकारी | क्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | एच.टी. ग्राहक (उच्च दाब /अति उच्च दाब ग्राहक) | मुख्य अभियंता (विद्युत), सा.बां.विभाग, मुंबई | सर्व महाराष्ट्र. |
| २. | मध्यम दाब (कमी दाब ग्राहक) | अधिक्षक अभियंता,(विद्युत) सा.बां.विभाग,मुंबई | मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे जिल्हा. |
| | | अधीक्षक अभियंता, (विद्युत) विद्युत निरीक्षण मंडल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, पुणे | पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, सोलापूर व रायगड जिल्हे. |
| | | अधिक्षक अभियंता, (विद्युत) सा. बां. विभाग, औरंगाबाद | औरंगाबाद, नांदेड, परभणी, जालना, हिंगोली, अहमदनगर, बीड, लातूर, उस्मानाबाद, नाशिक, धुळे, नंदूरबार व जळगांव जिल्हे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिक्षक अभियंता, (विद्युत) सा. बां. विभाग, नागपूर | नागपूर, भंडारा, गोंदीया, अमरावती, बुलढाणा, अकोला, वाशिम , वर्धा, चंद्रपूर , यवतमाळ आणि गडचिरोली जिल्हे. |
| ३. | लघुदाब | विद्युत निरीक्षक, | विद्यूत निरीक्षकांच्या निरीक्षणाचे कार्यक्षेत्र . |

या संदर्भात यापूर्वी निर्गमित केलेली शासन अधिसूचना क्र. आयईए-२००६/प्र.क्र. ५१९/ऊर्जा-३ , दिनांक २७.७.२००६ या व्दारे रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

( राहूल अस्थाना )
प्रधान सचिव (ऊर्जा)

प्रति,

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई, यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना दिनांक ५.५.२००८ च्या असाधारण राजपत्र भाग ४-अ मध्ये प्रसिध्द करुन अधिसूचनेच्या १०० प्रती या विभागास पाठवाव्यात.

( राहूल अस्थाना )
प्रधान सचिव (ऊर्जा)

प्रत:-
सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई.
सह सचिव, केंद्र शासन, विद्युत मंत्रालय, श्रमशक्ती भवन, रफी मार्ग, नवी दिल्ली-११०००१.
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,
मुख्य अभियंता (विद्युत), मुंबई सां.बां.वि.चेंबूर (पूर्व), मुंबई-७२.
सर्व विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२ यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना शासनाच्या वेब साईट वर तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रकाशित करुन प्रसिध्दी द्यावी.
ऊर्जा कक्षातील सर्व कार्यासने/निवड नस्ती (ऊर्जा-३)